# ४६ . संधी व निर्माल्य

## संधी ः

पाऊस नुकताच काढता पाय घेत होता . श्रावण महिना चालू होता . गणपतीचे वेध लागले होते . गणपतीसाठी आरास सामान , विजेचे दिवे , तोरणे दुकानात दिसू लागली . गणपतीचे कारखाने गल्लोगल्ली दिसू लागले . कारखान्यात दिवसभर कारागिरांची लगबग होऊ लागली . मूर्ती तयार होऊ लागल्या . वेगवेगळया आकारातील व मूडमधील . कारागिर रंगकाम करू लागले . गणपतीच्या आदल्या दिवशी रंगकामाचा शेवटचा हात फिरू लागला . परंतु काही मुर्ती रंगवायच्या बाकीच दिसत होत्या . मनात आले की अजून संपूर्ण संध्याकाळ व रात्र आहे . कदाचित उद्या पर्यंत मुर्ती रंगवून होतील . सकाळी फेरफटका मारायला बाहेर पडलो . गणेशचतुर्थीचा दिवस होता . मोठ्या उत्साहात लोक गणपतिच्या मूर्ती विधिपूर्वक घरी नेत होते . अजूनही काही मूर्तींचे रंगकाम बाकी होते .

संध्याकाळी परत फेरफटका मारताना गणपतीच्या कारखान्यात नकळतपणे डोकावू लागलो . कारखाने ओकेबोके दिसत होते . ब-याच मूर्ती विकल्या गेल्या होत्या . परंतु काही रंगकाम झालेल्या व ब-याच रंगकाम न केलेल्या मूर्ती शिल्लक होत्या . का कोणास ठाऊक पण हे दृष्य बघून मन उदास झाले . माणूस उदास व्हायला लागला कि समजावे कि त्याला म्हातारपणाची चाहूल लागली आहे .

मी फिरून , मित्रांकडे गणपतिला जाऊन घरी आलो . परंतु डोक्यातून हा विषय जाईना . मी विचार करू लागलो व ह्या प्रश्नाचे वेगवेगळे पैलू दिसू लागले .

गणपतिच्या मूर्ती उरण्यामागे मला कारागिरांची धंदेवाईक वृत्ती दिसू लागली . मागणीपेक्षा मूर्ती जास्त बनविल्यामुळेच हे घडले होते . पूर्वीच्या काळी मूर्तीची ऑर्डर आधीच द्यावी लागे . हल्ली आयत्यादिवशी सुद्धा मूर्ती मिळतात , ह्याचाच तो परिणाम होता . कारण पूर्वीच्या काळी फारश्या मूर्ती उरलेल्या आहेत असे आठवत नाही .
काही मूर्ती न रंगवता ठेवल्या होत्या ही गोष्टसुद्धा मालाचे नुकसान होऊ नये म्हणूनच केलेली कृती होती .

मग विचार आला की आता ह्या मूर्तींचे काय होईल ? अर्थात उत्तर सोपे होते . ह्या मूर्तींचे खाजगीत कारखान्यातच विसर्जन होईल व ती माती परत एकदा देवींच्या मूर्तीसाठी उपयोगात येऊ शकेल . (नवरात्रीत देवींची स्थापना केली जाते . वर्षागणिक नवीन मंडळे उदयास येत आहेत . )

परंतु एवढा विचार करूनही खरे उत्तर समोर येत नव्हते . मनात बदललेली आर्थिक परिस्थिती , समाजातील विषमता नजरेसमोर आली आणि त्या प्रखर प्रकाशात मनातील उदासपणाचे उत्तर दिसायला लागले .

प्रश्न कारखान्यात गणपती विकले न गेल्याचा नव्हताच. तसेतर दुकानातील न विकलेला माल परत गेला जातो व नवीन माल बदलून मिळतो.

प्रश्न होता संधीचा. ह्या प्रमाणे गणपतीच्या मूर्तींना सुद्धा सोडले नव्हते. खरेतर गणपति घरी आणून विधिपूर्वक पूजा केल्यानंतर त्याला देवत्व प्राप्त होते. खरेतर प्रत्येक मूर्ती आपल्या परीने चांगलीच बनविलेली होती. फक्त आकार, मूड, बैठक वेगवेगळी असेल.

थोडक्यात म्हणजे सर्व मूर्ती देवत्व मिळण्यास लायकच होत्या. तरी काही मूर्ती कोणीच विकत घेतल्या नाहीत. त्या मूर्तींना संधीच मिळाली नाही. आज समाजात नजर टाकली तर असेच द्दष्य दिसते नाही ?

बालवयापासून मोठेपणाची चिंता आधी आई वडिलांना व मग मुलांना भेडसावू लागते. त्यात स्पर्धेचे हे दिवस. बालपण कधी करपून जाते हे कळतच नाही. मग उच्चशिक्षण घेतल्यानंतर चांगली नोकरी मिळण्यासाठी धडपड सुरू होते. काही मुलांना शिक्षणाच्या मानाने चांगली संधी मिळते तर काही मुलांना मनासारखी नोकरी मिळत नाही. अर्थात आपल्या नशिबाचे भोग म्हणूनच ह्या गोष्टीकडे बघावे लागते. पण मग हे नशिबाचे भोग गणपतीच्या मूर्तींना सुद्धा. थोडे विचित्र वाटते नाही ?

अर्थात नोकरी मिळाल्यानंतर सुद्धा मनासारखे काम करायची संधी , निर्णय घेण्याची संधी मिळणे परत एकदा कठीण होते. चांगली नोकरी म्हणजे भरपूर पैसा सुद्धा. पण एका मर्यादेपर्यंत ह्या गोष्टी माणसाला सुख देतात. मिळविलेल्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग करता येत नसेल तर मन परत दुःखी होते. पैशाची गोडी लागत नाही. भौतिक गरजा भागतात पण मानसिक भूक भागत नाही. परंतु गरजा वाढलेल्या / वाढवलेल्या असतात.

मानसिक गरजांना आयुष्यात स्थान नसते. मानसिक भूक भागवण्यासाठी चांगल्या पगाराची नोकरी सोडणे म्हणजे जगाच्या द्दष्टीने मुर्खपणाच असतो.

तसेच एखादी कर्तृत्ववान मुलगी लग्न होऊन सासरी जाते व तीला कर्तृत्व गाजवायची संधीच मिळत नाही कारण तीच्या गुणांची कदरच सासरी नसते.

आज राजकारणातसुद्धा मोठया पदावरील नेत्यांना समाजासाठी चांगले निर्णय होण्याची संधी मिळतेच असे नाही कारण एका पक्षाचे सरकार नसते. सर्वांचा विचार घ्यावा लागतो. सर्वांनाच समाजाची काळजी असते पण प्रत्येकाचे मार्ग वेगळे असतात व त्यामुळे कोणालाच निर्णय वेळेवर होत नाही.

कुटूंबातील मुला व मुलींना शिक्षणाची सारखीच संधी मिळेल याची खात्री नसते. मग ह्या सर्वांवर उपाय काय ? मी तर म्हणेन की जन्म आपल्या हातात नाही पण जगणे तर आपल्या हातात आहे. निष्ठापूर्वक मन लावून कुवती प्रमाणे अथक प्रयत्न करणे आपल्या हातात आहे. प्रयत्न ऐवढे झाले पाहिजेत की दैवालाही दया आली पाहिजे व त्यातूनच आपल्याला संधी मिळू शकेल. अर्थात मिळालेली संधी शेवटची आहे असे कधीच मानता कामा नये. कोणाच्या आयुष्यात सूर्य लवकर उगवतो तर कोणाच्या आयुष्यात थोडा उशीरा उगवतो.

## निर्माल्य ः

भाद्रपदमहिना सरला , नवरात्र सुरू झाली. दस-याचा आदला दिवस असेल. रस्त्यावर आपटयाची पाने (सोने) झेंडूच्या माळा दिसू लागल्या. सोसायटीतील आपटयांच्या झाडावरील पाने गायब झाली. लोक न विसरता सोने (आपटयांची पाने ) व झेंडूच्या माळा विकत घेत होते.

दसरा पार पडला. दुस-या दिवशी सकाळी रस्त्यावर तीच आपटयांची पाने पायदळी तुडवली जात होती. एका दिवसांसाठी आपटयांच्या पानाला काय भाव होता ? मोठया कौतुकात लहान थोर मंडळी एकमेकांना आपटयाची पाने उर्फ सोने देत होती. नमस्कार करत होती. आशिर्वाद दिले व घेतले जात होते. पण दुस-या दिवशी त्या पानांचे नशीब फिरले होते. त्यापेक्षा ती पाने झाडावरून काढलीच नसती तर किती डौलात दिसली असती नाही ? दस-याच्या दिवशी नुसताच नमस्कार करून आशीर्वाद घेता आले नसते का ? दरवेळेला एखादे 'माध्यम' का लागते ?

अशीच गत प्रत्येकाची होत असते. गणपती विसर्जनानंतरच्या दुस-या दिवशी तर चौपाटीवर नको ते दर्शन अशी अवस्था होऊन जाते. काही सेवाभावी संस्था परत एकदा ह्या अर्धवट बुडलेल्या मूर्तींचे विसर्जन करतात.

कर्तृत्ववान माणसाची सुद्धा अशीच शोकांतिका झालेली आपण पाहतो. अशा लोकांच्या हुशारीचा उपयोग करून घेतल्यानंतर ही मंडळी अडगळीत फेकली जातात. त्यांची अडचण होते. त्यांचे निर्माल्य होते. मग ही मंडळी आपले गत आयुष्य आठवत , अंधारात दिवस घालवतात.

असेच दृष्य स्वांतंत्र्य दिनानंतर आपल्याला दिसते. आदल्या दिवशी अभिमानाने मिरवीलेले ध्वज दुस-या दिवशी कागद झालेले असतात व कोठेही पडलेले दिसतात. माणूस दिवसेंदिवस किती स्वार्थी होत आहे. 'कामापुरता मामा'. चिरकाल काही भावनाच नाही. प्रत्येक गोष्ट भोगून झाली की द्या टाकून.

मग जो नियम निर्जीव गोष्टींना तोच माणसांना. आईवडिल म्हातारे झाले की करा त्यांची खानगी वृधाश्रमात. कधीतरी तुम्हीसुद्धा म्हातारे होणार आहात व तुमची मुले तुमच्याशी अशीच वागली तर ?
काय मित्रांनो पटतोय का माझा विचार ?